**Name - रुपाली_जाधव**

**Contribution - साऊ- ज्योती**

**साऊ ज्योतीच्या उजेडात**
**मी उजळून निघाले,**

**सारे आकाश नभ तारे**
**मज ठेगणे जाहले,**

**साऊ ज्योतीच्या साथीने**
**दहा हत्तीचे बळ आले,**

**साऊ ज्योती सम अखंड-जीवन**
**दिन दुबळ्यासाठी वहावे.**

**साऊ ज्योती सम नर-नारीला**
**समान वंदावे,**

**साऊ ज्योतीच्या मार्गाने**
**शोषितांचे उद्धार व्हावे.**

**साऊ ज्योतीने आम्हा**
**दिस सोनेरी दाविले,**

---

**साऊ ज्योतीच्या उजेडात**
**मी उजळून निघाले,**

**#रुपाली_जाधव**

४ जानेवारी २०२०

साऊ

तू तेव्हाच या ब्राम्हणंशाहीच्यावर
छताडावर बसून
आम्हा शोषित वंचितासाठी जात धर्म
लिंगभेदाच्या पलिकडे जाऊन
शिक्षणाची दार खुली केलीस,
दगड गोटे शेणाचा मारा झेलत,
जीवाची पर्वा न करता,
पण आजही इथला मनु
गिळकृत करू पाहतोय आम्हाला नव्याने,
अक्षरबंदी जमावबंदी सारखे क्रूर कायदे लादून.
तरीही आम्ही लढत राहू,
तुझी प्रेरणा घेऊन.
इथल्या नवपेशवाईला
गाडण्यासाठी.

#रुपाली_जाधव
३ जानेवारी २०२०